**महाराष्ट्र लोकसेवा आयोग** **दि. 28 मे, 2018**

# घोषणा

**विषय: <u>उमेदवारांनी आयोगाचे मा. अध्यक्ष / मा. सदस्यांना भेटण्यावरील निर्बंध</u>**

महाराष्ट्र लोकसेवा आयोग हे शासनासाठी नियुक्ती प्राधिकरण म्हणून काम करत असल्याने, तसेच आयोग ही सांविधानिक संस्था असून निवडप्रक्रियेचे अत्यंत संवेदनशील काम करत असल्याने, उमेदवारांनी आयोगाच्या मा. अध्यक्षांना/सदस्यांना भेटण्यावर निर्बंध आहेत. उमेदवारांनी त्यांचा पत्रव्यव्हारसुद्धा अध्यक्षांना/सदस्यांना न पाठविता आयोगाच्या सचिवांच्या नावे करावयाचा आहे. अध्यक्षांचे/सदस्यांच्या नावे केलेल्या पत्रव्यव्हाराची दखल घेतली जाणार नाही, अशाही सूचना आहेत. ही बाब दिनांक 29.09.2016 रोजी, आयोगाच्या संकेतस्थळावर घोषणेद्वारे आयोगाने उमेदवारांच्या निदर्शनास आणली आहे. तरीही गत आठवडयात काही उमेदवारांनी आयोगाच्या कार्यालयात मा. अध्यक्षांना भेटण्याचा अट्टाहास केला. अध्यक्षांवरील उमेदवारांना भेटण्याबाबतचे निर्बंध आयोगाच्या कर्मचा-यांनी निदर्शनास आणुनही त्या उमेदवारांनी ठिय्या आंदोलन केले व माहिती अधिकाराखाली माहिती दिली जात नाही, आरक्षणाचे धोरण चुकीच्या पद्धतीने राबविले जाते, अशा तक्रारी प्रसिद्धीमाध्यमांद्वारे केल्या.

याद्वारे आयोगाच्या परीक्षांना बसणा-या उमेदवारांच्या व इतर संबंधितांच्या पुन्हा निदर्शनास आणण्यात येते की, उमेदवारांना अथवा त्यांच्या नातेवाईकांना आयोगाच्या मा. अध्यक्ष/ सदस्यांना भेटण्यावर निर्बंध आहेत. उमेदवारांना त्यांच्या कामांसाठी शक्यतो आयोगाच्या कार्यालयात येण्याची आवश्यकताच भासू नये असा आयोगाचा सातत्याने प्रयत्न आहे. तरीही अपवादात्मक परिस्थितीत उमेदवारांना आयोगाच्या कार्यालयात भेट देणे आवश्यक झाल्यास, संबंधित अवर सचिवांना भेटणे, व त्यांचेकडून समाधान न झाल्यास संबंधित उप सचिवांना भेटणे व अपवादात्मक स्थितीत सचिवांना भेटणे अपेक्षित आहे.

माहिती अधिकारात मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्यास कायद्यान्वये निश्चित केलेल्या कार्यपद्धतीनुसारच आयोगातील अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपिल करणे आवश्यक आहे. त्यांच्याकडून समाधान न झाल्यास माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल करणे अपेक्षित आहे. माहितीच्या अधिकाराखालील कामकाज त्या कायद्यातील कार्यपद्धतीनुसारच हाताळले जात असल्याने, इतरांना त्यात हस्तक्षेप करता येत नाही.

आरक्षण धोरण व ते राबविण्याची कार्यपद्धती हा शासनअखत्यारीतील विषय आहे. समांतर आरक्षणाच्या बाबतीत शासनाचे धोरणच आयोग राबवित आहे. याबाबतीत आयोग राबवित असलेली कार्यपद्धती शासन धोरणानुसार असल्याचे शासनाने कळविलेले आहे.

उमेदवारांनी वरील बाबींची नोंद घ्यावी व आक्षेपार्ह कृत्ये करण्यापासून परावृत्त व्हावे.

**सचिव**